# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र. १८३** **दिनांक ९/०७/२०२१**

## वेश्या व्यवसायावर कारवाई करुन ०२ पिडित मुलींची केली सुटका - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर पथकाची कामगिरी.

दिनांक ७/७/२०२१ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वपोनि. श्री एस.एस.पाटील यांना गोपनीय माहिती मिळाली की, वेश्यादलाल इंदिरादेवी प्रजापती ही पुरुष गिऱ्हाईकांकडुन पैसे स्विकारुन पुरुष ग्राहकांना वेश्यागमनाकरीता मुली पुरवित असून नैवद्द हॉटेल, मिरा-भाईंदर रोड, मिरारोड पूर्व या ठिकाणी वेश्यागमनाकरीता पुरुष गिऱ्हाईकांना मुली पुरविणार आहे. मिळालेल्या बातमीवरुन वपोनि. श्री पाटील यांनी पथकासह नमुद ठिकाणी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना पाठवुन सत्यता पडताळुन छापा टाकला असता, महिला वेश्यादलाल श्रीमती इंदिरादेवी मांगीलाल प्रजापती वय ४२ वर्ष रा. दहिसर पूर्व. मुळगाव- राजस्थान ही वेश्यागमनासाठी ग्राहकांकडुन पैसे स्वीकारुन मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने तिला वेश्यगमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०२ मुलींची सुटका करण्यात आली आहे. महिला वेश्यादलाल हिचे विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे पो.हवा./२२६९ उमेश पाटील यांनी सरकार तर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन मिरारोड पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २३९/२०२१ भा.द.वि.सं. कलम ३७०,३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री महेश पाटील, पोलीस उप.आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष-भाईंदर विभागाचे व.पो.नि. श्री. एस. एस. पाटील, पो.हवा.२२६९ उमेश पाटील, विजय निलंगे, रामचंद्र शिवाजी पाटील, पो.शि. ३६६०केशव शिंदे, मपोना.१७८९ यम्बर, म.पो.ना./२८४५ कमल चव्हाण, चालक पोना/२६३८ गावडे यांनी केली आहे.

-----ooooo-----